सत्र खटला क्रं. ३५/२०२०

सरकार वि. अक्षय ब्राह्मणे + २

**निशाणी क्रं. ३५**

## सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०२ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक कळवितो की,

नाव – **नरहरी भगवान जायभाये**

वय – **३९ वर्षे,** व्यवसाय – **एस.टी. वाहक**

राहणार –**चिखली ता. चिखली जि. बुलडाणा**

## अभियोगपक्षातर्फे सरतपास विधीज्ञ श्री. व्ही. एम. बापट यांचेमार्फत..

१. मी २०२० साली खामगांव आगारामध्ये एस.टी.वाहक म्हणून कार्यरत होतो. दिनांक ०६.०२.२०२० रोजी माझी खामगांव आगारामध्ये नांदुरा ते जिगांव या एस.टी.बसवर वाहक म्हणून ड्युटी होती. सदर बस खामगांव ते नांदुरा व नांदुरा ते जिगांव या मार्गावर कार्यरत होती. सदर बसवर फिर्यादी प्रशांत सरदार हा चालक म्हणून कार्यरत होता. सदर बसचा क्रमांक ९६९५ असा होता. सदर बस खामगांव येथून दुपार ०१.३० ते ०१.४५ वाजता निघाली. आम्ही नांदुरा येथुन जिगांव येथे बसच्या फे–या मारल्या व आम्ही जिगांव येथे मुक्कामी थांबलो. दुस–या दिवशी सकाळी जिगांव येथून नांदूरा येथे येण्यासाठी निघालो. आम्ही नांदुरा येथे ०७.०० वाजता पोहचलो. तसेच नांदुरा येथून दहीवडी येथे जाण्यासाठी निघालो. त्यावेळी दहीवडी गावाजवळ काही मुले रस्त्यावर व्यायाम करत होती. आम्ही दहीवडी येथे पोहचून बसमध्ये शाळेतील मुले घेतली व परत नांदु–याकडे निघालो. दहीवडीपासून एक ते दीड किलोमीटर अंतरावर आमची बस थांबली. त्यावेळी बसचालक व मुलांमध्ये बोलणे चालु झाले. त्यावेळी मला बसचा दरवाजा उघडा असा आवाज आला. त्यावेळी गाडीमधील मुलाने दरवाजा उघडला. त्यावेळी त्यामुलांची व बसचालकाची वादावादी झाली. मी मध्यस्थी करुन सोडवासोडव केली व त्या मुलांना बसमधून खाली उतरवले. आम्ही तेथून नांदुरा येथे आलो व त्यानंतर बस चालकाने घटनेची फिर्याद दाखल केली. मी त्या मुलांना प्रत्यक्ष ओळखू शकणार नाही. ते न्यायालयासमक्ष हजर आहेत किंवा नाही हे मी सांगू शकत नाही. पोलीसांनी माझा जबाब नोंदविला होता किंवा नाही हे मला आठवत नाही.

सरतपास पुर्ण.

<u>उलटपास आरोपींतर्फे वकिल आय. एफ. जैन यांचेमार्फत..</u>

०२. बसमध्ये एकुण ३० ते ४० शाळेतील मुले होती. बसमधील मुलांकडे पास होती व काही तिकीटावरील प्रवासी होते. वाहकाने वाटप केलेल्या तिकीटांची मशीनमध्ये नोंद होते. सदर मशीनची नोंद डेपोमध्ये करावी लागते. सदर बसचा रुट क्रमांक मला माहित नाही. आमची बस जिगांव येथे एक दिवस मुक्कामी होती. जिगांव येथून नांदुरा येथे जाण्यासाठी अंदाजे ४५ मिनीटे लागतात. नांदुरा येथे बस निघाली असता तेथे डेपोमध्ये नोंद करावी लागते व ती परत आल्यानंतर सुध्दा तशी नोंद घ्यावी लागते. असे काही घडले नाही की, आमची बस नांदुरा येथून दिनांक ०५.०२.२०२० ला निघाली व दिनांक ०६.०२.२०२० पर्यंत मुक्कामी राहली. खामगांव डेपोमधून बस निघाली असता तिची नोंद तेथे घ्यावी लागते. नांदुरा ते जिगांव व जिगांव ते नांदुरा हे अंतर अंदाजे ०२ तासांचे आहे. जिगांव येथून आमची बस दहीवडी येथे गेली नाही. बसमध्ये विद्यार्थी सोडून इतर प्रवासी नव्हते. घटना अंदाजे ५ मिनीटे चालली. बस थांबल्यानंतर बाचाबाची झाली व त्यानंतर बस रवाना झाली. एस.टी. बसचा पंचनामा झाला नाही. घटनास्थळाचा पंचनामा माझ्यासमक्ष झाला नाही. बसमधील विद्यार्थी माझे परिचयाचे नव्हते. घटनेच्या दिवशी माझी वाहक म्हणून ड्युटी असल्याचे कागदपत्रे मी पोलीसांना दिले नाही. आमची बस विहीत कालावधीमध्ये निघून वेळेत पोहोचली व त्याची माहिती आम्ही कार्यालयामध्ये वेळेत जमा केली. बसमध्ये चालक व वाहक व्यतिरीक्त इतर शासकीय कर्मचारी नव्हते.

०३. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनेच्या वेळी बसवर वाहक म्हणून कार्यरत असल्याचे चुकीचे सांगत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by RAJENDRAKUMAR BABASAHEB GIRI
Date: 2026.04.08 17:22:08 +0530

दि.०८/०४/२०२६

**(आर. बी. गिरी)**

अतिरीक्त सत्र न्यायाधीश, मलकापूर